# टागोर नगर श्री दत्त साई
## सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

(नोंदणी क्रमांक :- एम. यु. एम. / एम. एच. एडीबी. / एच. एस. जी. / (टि. सी.) १२५७० / सन २००५-२००६)

चाळ क्र. १०३ ते १०७ टागोर नगर, ग्रुप नं. ६, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०० ०८३.


संदर्भ क्र :

दिनांक : 06.09.2021

## विशेष सर्वसाधारण सभेची सुचना

**विषय :- आपल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील जुन्या व जिर्ण इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी प्राप्त झालेले प्रस्ताव सर्व सभासदाच्या समक्ष उघडून विहित निकषानुसार तुलनात्मक तक्ता बनविण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता येण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करणेबाबत.**

टागोर नगर श्री. दत्तसाई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादितच्या व्यवस्थापन समितीने शासन निर्णय दिनांक ०४ जुलै २०१९ मधील मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन, संस्थेच्या इमारतीचे पुनर्विकास करण्यासाठी नामांकित वृत्तपत्रात रितसर जाहिरात देवून, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार / विकास व्यवस्थापन अभिकरण / विकासक यांचे कडून , देकार प्रस्ताव मागविले होते. संस्थेच्या व्यवस्थापन समितीने शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार संस्थेच्या इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी दिलेल्या जाहिरातीस अतिशय चांगला प्रतिसादर मिळाला आहे. त्यामुळे संस्थेला प्राप्त झालेल्या देकार प्रस्तावातून , संस्थेच्या इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी सर्वोत्तम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार / विकास व्यवस्थापन सल्लागार / विकासक यांची निवड करणे आपणांस शक्य होणार आहे.

...२.../-

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयातील अ.क्र. १६ (ब) मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दतीनुसार, संस्थेला प्राप्त झालेले देकार प्रस्ताव सभेस उपस्थित असलेल्या सर्वासमक्ष उघडण्यात येतील. त्यानंतर सर्व देकार प्रस्तावाची छाननी करुन विहित निकषानुसार तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येणार आहे. संस्थेच्या व्यवस्थापन समितीने सदर प्रक्रिया पार पाडण्यासाठी रविवार दिनांक १२.०९.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा, धी ग्रेट मराठा जिमन्याशियमच्या प्रांगणात आयोजित केली आहे. सदर सभेला संस्थेच्या सर्व सभासदानी कृपया उपस्थित राहून, हि प्रक्रिया अतिशय पारदर्शकपणे व सुरळितपणे पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, हि विनंती.

(शांताराम मोहिते)

सचिव

टिप :-

१)सर्व सभासदानी कोविड - १९ प्रतिबंध सुरक्षा सुचनांचे जसे की मास्क वापरणे, सामाजिक अंतर ठेवणे व सॅनिटायझरचा वापर करणे इत्यादी काटेकोरपणे पालन करावे.

२)जे सभासद सुचना मिळूनही हया सभेस उपस्थित राहणार नाहीत त्यांना हया सभेत करण्यात आलेली कार्यपध्दती व प्रक्रिया मान्य आहे असे समजण्यात येईल.